NAAC Accredited-
2022'B++' Grade
(CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

केगाव, सोलापूर - पुणे महामार्ग, महाराष्ट्र- ४१३२५५



## 'कुलगुरू' पदासाठी अर्ज

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर हे महाराष्ट्र राज्यातील एक तरुण राज्य विद्यापीठ असून, हे विद्यापीठ १ ऑगस्ट, २००४ रोजी स्थापन झाले आहे. सोलापूर जिल्हयातील नागरीकांची सोलापूर जिल्हयासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना व्हावी अशी दिर्घ काळापासुनची इच्छा होती. त्यामुळे या विद्यापीठाशी जिल्हयातील नागरीकांची विद्यापीठाच्या स्थापनेपासून विद्यापीठाबद्दल भावनिक ओढ निर्माण झालेली आहे. सद्यस्थितीत हे विद्यापीठ सोलापूर शहरापासून सुमारे १० किलोमिटर अंतरावर राष्ट्रीय महामार्गावर (NH-०९) पुण्याच्या दिशेने आहे. विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ कलम २ (एफ) आणि १२ (बी) अंतर्गत मान्यताप्राप्त विद्यापीठ असून सध्या हे विद्यापीठ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये विधिस्थापित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल हे विद्यापीठाचे मा. कुलपती असून त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या "कुलगुरु" पदासाठी नावे प्रस्तावित करण्यासाठी "शोध व निवड समिती" घटित केली आहे. ही समिती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ११ (३) (एफ) नुसार कुलगुरु पदासाठी आवश्यक असलेली पात्रता आणि अनुभव पूर्ण करणाऱ्या प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ व्यक्तींकडून अर्ज आणि संस्थाकडून योग्य व्यक्तींची नामांकने मागवत आहे. कुलगुरु पदासाठी विहित पात्रता आणि अनुभव यासंबंधीचे सर्व आवश्यक ते तपशील, अर्जाचे स्वरुप आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ११ चा उतारा URL: http://www.sus.ac.in/estd/Recruitment-OR-Employment-Opportunities वर तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या www.sus.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

'कुलगुरु' पदासाठीची विहित शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पूर्तता करणारे आणि या प्रतिष्ठेच्या व आव्हानात्मक जबाबदारीचे काम करण्यास इच्छुक व्यक्ती अर्ज करु शकतात. विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव, अर्जाचा नमुना आणि इतर आवश्यक कागदपत्रांचा तपशील असणारी सविस्तर जाहिरात विद्यापीठाच्या www.sus.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अत्यावश्यक पात्रता आणि अनुभवाची पूर्तता करणारे आणि जबाबदारी स्वीकारण्यास इच्छुक उमेदवार अर्ज करतांना अर्जासोबत URL वर उपलब्ध (१) तपशिलांचा सारांश (परिशिष्ट-१), (२) ना-हरकत प्रमाणपत्र (परिशिष्ट-२), आणि (३) चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (परिशिष्ट-३) नमुन्यातील कागदपत्रांसह अर्ज करु शकतील. आवश्यक व कालक्रमानुसार जोडलेल्या दस्तऐवजांसह तसेच सुव्यवस्थित व सर्व तपशील भरलेला, पंधरा (१५) पानांपेक्षा जास्त नसलेला आपला विहित अर्ज (doc आणि pdf स्वरुपात) उमेदवारांनी 'Google Drive' वर सादर करणे अनिवार्य असून त्याचा दुवा (nodalofficer.sus@gmail.com) या ई-पत्त्यावर नोडल

अधिकाऱ्यास सादर करावा. तसेच उमेदवारांकडून त्याची एक मुद्रित प्रत डाक किंवा कुरिअरने एका बंद लिफाफ्यावर "कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या पदासाठी अर्ज" असे ठळक आणि सुवाच्च अक्षरात लिहून खाली निर्देशित नोडल अधिकाऱ्याच्या पत्त्यावर दिनांक २०/०७/२०२३ किंवा त्यापूर्वी पोहोच करणे आवश्यक आहे.

Name: : Shri. C. P. Singh

Address : Former Joint Registrar
Room No. FB-203,
IIT Kanpur,
Kanpur- 208016
E-mail: nodalofficer.sus@gmail.com
Tel. No. : 0512-6792101/8090019996

संस्थासुध्दा योग्य उमेदवारांचे नामनिर्देशन करु शकतील, तथापि, अशा सर्व उमेदवारांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती २०/०७/२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी नोडल अधिकाऱ्यांकडे विहित नमून्यात पाठवणे आवश्यक आहे.

उमेदवारांचे अर्ज छाननी केल्यानंतर विद्यापीठाच्या 'कुलगुरु' पदासाठी पात्र आणि योग्य असणाऱ्या अशाच उमेदवारांना शोध व निवड समितीशी सुसंवाद साधण्यासाठी आमंत्रित केले जाईल. अर्ज छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. प्रसिध्द केलेल्या यादीतील पात्र उमेदवारांनी या पदाबाबतची आपली योग्यता तसेच या विद्यापीठासंबंधीची भविष्यवेधी भूमिका दर्शविणारे प्रत्येकी दोन पृष्ठांचे लेखन आणि तीन शिफारसी संदर्भपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे. पात्र उमेदवारांनी शोध व निवड समितीशी सुसंवाद साधताना त्यांनी संपादन केलेले यश आणि विद्यापीठाबद्दलचा त्यांचा भविष्यवेधी दृष्टीकोन स्पष्ट करणारे संक्षिप्त सादरीकरण करणे आवश्यक आहे.

विहित तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज शोध व निवड समितीकडून विचारात घेतले जाणार नाहीत. शोध व निवड समितीचे अध्यक्ष किंवा सदस्य यांना संपर्क साधण्याचा किंवा त्यांच्यावर दडपण / दबाव आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांना या प्रक्रियेतून बाद केले जाईल.

अध्यक्ष
शोध व निवड समिती

दिनांक: २०/०६/२०२३